...युरिटायझेशन) व वित्तीय मत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती ...धाची अंमलबजावणी अधिनियम,2002 नूसार मालमत्तेचा ताबा ...मिळणेबाबत.

...संदर्भ - 1) श्री. धिरेंद्रकुमार, प्राधिकृत अधिकारी, सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा लक्ष्मी कारंजा, अहमदनगर तालुका अहमदनगर 414001 जिल्हा अहमदनगर यांचा अर्ज दि.28/08/2021.

2) रोखीकरण (सिक्युरिटायझेशन) व वित्तीय मत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमलबजावणी अधिनियम, 2002

3) इकडील आदेश क्र.डी.सी/एस.आर./सिक्यु केस/204/2019,दि.15/03/2019

क्र.डी.सी./एस.आर./सिक्यु केस क्र./175/2021 **आदेश** अहमदनगर दि.24/12/2021

ज्याअर्थी, अर्जदार सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा लक्ष्मी कारंजा, अहमदनगर तालुका अहमदनगर जिल्हा अहमदनगर यांचे प्राधिकृत अधिकारी, श्री. धिरेंद्रकुमार, यांनी दि.28/09/2021 रोजी इकडेस देऊन विनंती केली आहे की, कर्जदार श्री मुदस्सर रशिद शेख, रा. पिंजार गल्ली, अहमदनगर तालुका अहमदनगर जिल्हा अहमदनगर व इतर यांनी मौजे नागरदेवळे, स.न. 242/1 चे एकुण क्षेत्र 212.5 पैकी प्लॉट नं. 67 चे क्षेत्र 100.00 चौ.मी. व बांधकाम क्षेत्र 68.00 चौ.मी. ही मिळकत तारण ठेऊन अर्जदार सेंट्रल बँक ऑफ इंडीया यांचेकडून रक्कम रूपये 23,50,000/- इतके कर्ज घेतलेले आहे.

ज्याअर्थी, अर्जदार बँक यांनी रोखीकरण(सिक्युरिटायझेशन) व वित्तीय मत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमलबजावणी अधिनियम, 2002 मधील कलम 13(2) नुसार दि.01/06/2018 अन्वये नोटीस देवून एकुण येणे कर्ज रक्कम रू.21,41,621/- व तयावरील व्याज ही रक्कम नोटीस मिळालेपासुन 60 दिवसांचे आत भरणे कामी कर्जदार यांना कळविले आहे. तथापि, सदर कर्जदार हे कर्ज परत फेड करत नसल्याने सदर मालमत्तेचा ताबा रोखीकरण(सिक्युरिटायझेशन)व वित्तीय मत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमल बजावणी अधिनियम,2002 मधील कलम 14 प्रमाणे मिळकतीचा ताबा मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी, प्रस्तुतच्या केसमध्ये अर्जदार बँक यांनी रोखीकरण (सिक्युरिटायझेशन) व वित्तीय मत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमलबजावणी अधिनियम,2002 मधील तरतुदीनुसार प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला असुन, अर्जदार बँक यांनी खालील कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे.

अ.क्र.	तपशिल
1.	सेंट्रल बँक ऑफ इंडीया नोंदणिकृत असलेबाबत पुरावा.
2.	मौजे नागरदेवळे, स.न. 242/1 चे एकुण क्षेत्र 212.5 पैकी प्लॉट नं. 67 चे क्षेत्र 100.00 चौ.मी. व बांधकाम क्षेत्र 68.00 चौ.मी. ही मिळकत तारण ठेऊन अर्जदार सेंट्रल बँक ऑफ इंडीया यांचेकडून रक्कम रूपये 23,50,000/- इतके कर्ज घेतलेबाबत प्रत.
3.	तारण मिळकतीचा 7/12.
4.	कर्जदार यांना कर्ज रक्कम भरण्याकामी रोखीकरण (सिक्युरिटायझेशन) व वित्तीय मत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमलबजावणी अधिनियम, 2002 मधील कलम 13(2)